शनिवार, ५ डिसेंबर २०२० तरुण भारत

# रेडेकर धर्मादाय रुग्णालयात आज रक्तदान शिबीर

**गडहिंग्लज :** येथील कै. केदारी रेडेकर धर्मादाय रुग्णालयाच्या वतीने नवीन सुरु करण्यात आलेल्या रक्त साठवणूक केंद्राच्या माध्यमातून दि. ५ डिसेंबर रोजी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरामध्ये रक्तदान केलेल्या रक्तदात्यांच्या घरातील कोणत्याही व्यक्तीला रक्ताची गरज भासल्यास मोफत रक्ताची बॅग पुरवण्यात येणार आहे. धर्मादाय रुग्णालय येथे ही रक्तपेढी २४ तास सुरु असून याचा लाभ घ्यावा असे आवाहन रुग्णालय प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.